पी.डब्ल्यु.डी.व्ही. **क्र.** ३४/२०२५

**<u>गैरअर्जदार क्र. ३ ते ६ यांच्या दि.१६.०६.२०२५ रोजीच्या अर्जावरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र. ३ ते ६ यांनी दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांचे थोडक्यात कथन असे आहे की, सदर गैरअर्जदार क्रमांक ३ ते ६ हे कधीही अर्जदारासोबत एकत्रित कुटूंबात अथवा सामायिक घरात एकत्र सोबत राहिलेले नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात अर्जदार हिने सदर गैरअर्जदार क्रमांक ३ ते ६ विरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कुठलेही स्पष्ट आरोप केलेले नाही. तसेच सदर प्रकरणात संरक्षण अधिकारी यांचा कौटुंबिक घटनांचा अहवाल देखील अभिलेखावर नाही. त्यामुळे सदर गैरअर्जदार यांनी त्यांना प्रस्तुत प्रकरणातून काढून टाकण्याची अथवा वगळण्याची विनंती केलेली आहे.

२. प्रस्तुत अर्जास मुळ अर्जदार यांनी त्यांचा लेखी खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांचे थोडक्यात कथन असे आहे की, सदर गैरअर्जदार क्रमाक ३ ते ६ यांनी सदर मुळ अर्जदाराचा कौटुंबिक छळ केलेला आहे व त्याबाबतचे सर्व कथन मुळ अर्जात नमूद आहेत. त्यामुळे सदर अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्ज, त्यावरील लेखी खुलासा व अभिलेखाचे अवलोकन केले. तसेच अभिलेखावरील लेखी युक्तिवादाचे अवलोकन करुन, दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुत अर्जातील मागणीच्या अनुषंगाने अर्जदाराच्या निशाणी क्र. १ वरील मुळ अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक १ यांचा दिनांक २६/१२/२०२४ रोजी विवाह संपन्न झाल्यानंतर, सदर अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक १ ते ६ हे गैरअर्जदार क्रमांक १ यांच्या वाकड येथील फ्लॅट मध्ये राहायला गेले होते, असे अर्जदाराने स्पष्टपणे तिच्या मुळ अर्जात कथन केले आहे. त्यामुळे सदर बाब सदर

गैरअर्जदार यांनी नाकारली असली तरी, अर्जदाराचे सदर शपथेवरील कथन विचारात घेतले असता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २ (एस) प्रमाणे सदर अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक १ ते ६ हे अर्जदाराच्या विवाहानंतर वाकड येथील गैरअर्जदार क्रमांक १ यांच्या फ्लॅट मध्ये सुरुवातीचे काही दिवस एकत्रित राहिले होते, ही बाब प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदार व सदर गैरअर्जदार क्र. १ ते ६ यांच्यामध्ये सदर कायद्याचे कलम २ (एफ) प्रमाणे कौटुंबिक नातेसंबंध आलेला आहे, हे स्पष्ट होते.

**५.** तसेच दुसरी महत्वाची बाब म्हणजे, अर्जदार हिने तिच्या मुळ अर्जात सदर गैरअर्जदार क्र. १ ते ६ विरुध्द कौटुंबिक छळाचे आरोप केलेले आहे का? हे पाहणे आवश्यक आहे. त्यासाठी अर्जदार यांच्या मुळ अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक १ यांच्या विवाहानंतर दि. २८/१२/२०२४ रोजी गैरअर्जदार क्रमांक १ ते ५ यांनी बेडरुममध्ये एक बैठक घेतली व त्यानंतर गैरअर्जदार क्रमांक ४ यांनी आरडा–ओरड करुन ते दुसरया दिवशी सकाळी तेथून निघून जातील, याप्रमाणे त्यांनी आरडा ओरड केली. तसेच त्याचं दिवशी गैरअर्जदार क्र. २ हिने अर्जदाराकडे तिच्या विवाहातील सर्व दागिने मागितले. सदर गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांच्या उपरोक्त कृतीमुळे देखील अर्जदाराला मानसिक त्रास झाला होता, असे तिने मुळ अर्जात नमूद केलेले आहे.

**६.** तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम ३ प्रमाणे मानसिक त्रास, ही बाबदेखील कौटुंबिक छळाचाचं एक भाग आहे. तसेच गैरअर्जदार क्र. ६ यांनी सदर अर्जदाराचा निश्चित काय कौटुंबिक छळ केला आहे, हे अर्जात विस्तृतपणे नमूद नसले तरी, सदर गैरअर्जदार क्र. ६ यांनी देखील सदर अर्जदाराचा कौटुंबिक छळ केलेला आहे, असे अर्जदाराने तिच्या मूळ अर्जात स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे सदर गैरअर्जदार क्र. ६ यांनी अर्जदाराचा निश्चित काय व कोणत्या पध्दतीने कौटुंबिक छळ केलेला आहे, ही बाब अर्जदाराच्या पुराव्यानंतर स्पष्ट

होईल.

**७.** एकंदरीत अर्जदाराच्या निशाणी क्रमांक १ वरील मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, तिने सदर अर्जामध्ये सर्व गैरअर्जदारांविरुध्द शपथेवर कौटुंबिक छळाचे आरोप केलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करता येणार नाही. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Shri. Bharat Santaram Jagdale

Digitally signed by Shri. Bharat Santaram Jagdale
Date: 2026.02.04 15:23:27 +0530

ठिकाण :– पुणे. (भरत सं. जगदाळे)

दिनांक :–०४/०२/२०२६ सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

लष्कर न्यायालय, पुणे.